SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO

(Extra ordinary)

Friday, the 29th December, 2023

NOTIFICATION

No. 210/2023 Dated : 29.12.2023

Subject :- Appointment of Vice-Chancellor of Sant Gadge Baba Amravati University

It is notified for general information of all concerned that His Excellency the Governor of Maharashtra and the Chancellor of Sant Gadge Baba Amravati University under the powers conferred upon him under Section 11(8) of the Maharashtra Public Universities Act, 2016 has appointed **Dr.Vijay L. Maheshwari, Vice Chancellor, Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon to act as Vice-Chancellor of Sant Gadge Baba Amravati University** with effect from 29th December, 2023 (B.N.), for a period of six months or till the appointment of a regular Vice-Chancellor, in accordance with the provisions of Section 11 of the MPU Act, whichever is earlier.

Dr.Vijay L. Maheshwari has assumed the charge of the office of the Vice-Chancellor on 29th December, 2023 (B.N.).

Sd/-
(Dr.T.R.Deshmukh)
Registrar
Sant Gadge Baba Amravati University.

अधिसूचना

क्र. २११/२०२३ दिनांक - २९.१२.२०२३

विषय : महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ ..... अधिष्ठाता तदर्थ नामनिर्देशनाबाबत

संदर्भ : १) असाधारण अधिसूचना क्र. ३०/२०१८, दि. १३.४.२०१८
२) असाधारण अधिसूचना क्र. ३५/२०१९, दि. १६.४.२०१९
३) असाधारण अधिसूचना क्र. ४०/२०२०, दि. २०.४.२०२०
४) अधिसूचना क्र. ४/२०२१, दि. ७.१.२०२१
५) असाधारण अधिसूचना क्र. ४०/२०२१, दि. १६.४.२०२१
६) असाधारण अधिसचूना क्र. ५३/२०२१, दि. २.६.२०२१
७) असाधारण अधिसूचना क्र. ९२/२०२१, दि. ४.१०.२०२१
८) असाधारण अधिसूचना क्र. १७/२०२३, दि. ६.२.२०२३

संदर्भीय क्र. १) वरील अधिसूचनेमध्ये उल्लेखित विद्यापीठ प्रस्ताव व त्यानुषंगाने मा.कुलपती कार्यालयाने दिलेल्या मान्यतेच्या अधीन राहून अधिसूचनेतील वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा आणि आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखांकरिता अधिष्ठात्यांचे तदर्थ नामनिर्देशन करण्यात आले होते.

सर्व सामान्यांच्या माहितीकरीता याद्वारे अधिसूचित करण्यात येते की, संदर्भीय क्र. ४ व ५ वरील अधिसूचनेच्या माध्यमातून अधिसूचनेमध्ये उल्लेखित विद्याशाखांचे तदर्थ अधिष्ठाते, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम १५(३) च्या परंतुकाअंतर्गत हंगामी कुलगुरूंनी, संदर्भीय क्र. ६ वरील अधिसूचनेद्वारे सदर्हू विद्याशाखांच्या शैक्षणिक कामकाजामध्ये अडथळा निर्माण होऊ नये म्हणून दि. २.६.२०२१ पासून नवीन नामनिर्देशन होईपर्यंत किंवा नवीन अधिष्ठात्यांची नियुक्ती होईपर्यंत, यापैकी जे आधी घडेल अशा कालावधीसाठी नामनिर्देशीत केले होते. तसेच नियमित कुलगुरूंनी संदर्भीय क्र. ७ वरील अधिसूचनेद्वारे सदर्हू विद्याशाखांच्या तदर्थ अधिष्ठात्यांना पुन्हा मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला होता. नियमित कुलगुरूंचे आकस्मित निधनानंतर विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा पदभार डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संभाजीनगर (औरंगाबाद) च्या मा.कुलगुरूंकडे देण्यात आला होता आणि त्यांनी संदर्भीय क्र. ८ वरील अधिसूचनेद्वारे सदर्हू नामनिर्देशित प्राध्यापकांना, कलम १५(३) अंतर्गत, नवीन नामनिर्देशन होईपर्यंत अधिष्ठाता पदाची जबाबदारी पुढील आदेशापर्यंत चालू ठेवण्याला मान्यता दिली होती. तथापि, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कुलगुरूंचाही कार्यकाळ संपुष्ठात येत असल्याने तसेच या विद्यापीठाला नियमित कुलगुरू मिळण्याला अजून काही कालावधी लागणार असल्याने मा.कुलपतींनी, कवयित्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव च्या मा.कुलगुरूंकडे या विद्यापीठाच्या कुलगुरूपदाचा अतिरिक्त पदभार सुपूर्द केला. आज दि. २९.१२.२०२३ रोजी मा.कुलगुरूंनी पदभार स्विकारल्यानंतर संदर्भीय क्र. ४ व ५ वरील अधिसूचनेद्वारे नामनिर्देशीत तदर्थ अधिष्ठात्यांना पुन्हा कलम १५(३) अंतर्गत नवीन नामनिर्देशन होईपर्यंत अथवा शैक्षणिक वर्ष २०२३-२४ संपेपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत कायम ठेवण्याला मान्यता दिली आहे.

स्वा./-
(डॉ.तुषार देशमुख)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****